# Cosmos Multidisciplinary Research E-Journal

Recognized International Peer Reviewed Journal

ISSN 2456-1665

VOLUME I | ISSUE II | OCT - NOV - DECEMBER 2016



**Dr. Tukaram Gajar**
Executive Editor & Publisher

**Prof. Dr. Gajhans D.S.**
Chief Editor

# INDEX



| Sr. No. | Title of article | Author / Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय उच्च शिक्षणातील बदल: एक आढावा | डॉ. राजेंद्र गायकवाड | 1-4 |
| 2 | A Geographical Study of Selected Cash Crops Production & Productivity in Aurangabad District | Mr.Gaikwad B.T. | 5-8 |
| 3 | नाटकातील स्वामीत्व भावनांचे उदात्तीकरण (संजय सोनवणे यांच्या विक्रमादित्य नाटकाच्या संदर्भात) | प्रा.बनसोडे के.आर. | 9-12 |
| 4 | प्राचीन भारतीय इतिहासात जुगार विशेषत्वाने द्यूत | घारपुरे सारंग विनायक | 13-16 |
| 5 | ग्रामीण भागात आरोग्य व स्वच्छता विषयक जागरुकता - एक सामाजिक अध्ययन (जालना जिल्ह्यातील शिवणी गावाच्या संदर्भात) | प्रा. वैद्य आर.जे. | 17-20 |
| 6 | अनुसयाबाईचे ओवीगान - ज़ीवनाचे उत्कट चित्रण | प्रा. क़ंदुले जी.व्ही. | 21-26 |
| 7 | Caste & Politics in India (19th Century) | Dr. Gawande K.S. | 27-32 |
| 8 | Vandalism Practices in College Libraries of Marathwada | Dr. M.D. Garad | 33-42 |
| 9 | A Study of General Landuse Pattern in Jalna District | Dr. Khan A.I.<br>Mr. Pathan M.F. | 43-49 |
| 10 | बंजारा जमातीचा इतिहास | प्रा.डॉ.अंकुशराव अंबादास चव्हाण | 50-54 |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal ISSN No. 2456-1665

# नाटकातील स्वामीत्व भावनांचे उदात्तीकरण (संजय सोनवणे यांच्या विक्रमादित्य नाटकाच्या संदर्भात)

**प्रा.बनसोडे के.आर.**
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना.

---

**प्रास्ताविक :**

कथात्मक साहित्यात कथा, कादंबरी, काव्य व नाटक हे वाङमय प्रकार येतात. आशयाच्या दृष्टीकोनातून सर्व वाङमय प्रकार एकच वाटत असले तरी त्यांचे स्वरूप सारखेच आहे. नाटक हा करमणूकचा सर्वांना प्रिय असणारा दृक श्राव्य कला प्रकार आहे. नट, नाचणे, अभिनय करणे या शब्दावरून 'नाटक'हा शब्द आला आहे. अभिनय करणा-याचे जे कृत्य ते नाटक झाले. नर्तन, अभिनय, रूप बदलने, विकार प्रदर्शन, जीवन चित्रन इत्यादी विविध अंगानी नाटक विकसित झाले." त्रैलोक्याच्या भावनांचे अनुकरण,प्रकटीकरण "म्हणजे नाटक असे मत भरताने आपल्या नाटयशास्त्र या ग्रंथात मांडले. अश्वघोष, भास, कालिदास, शुद्रक, हर्षवर्धन, भवभूती, इ. समर्थ नाटककारांनी भारतीय नाटयाची परंपरा संमृध केली. ज्ञानेश्वरी, या ग्रंथात नट, काव्य, नाटक असे उल्लेख आले आहे. "देखा काव्य, नाटका का", "नटले मी घालवे", "नटु जैसा न संकव" (जो.प्र.) अशा ओळी मिळतात. आधुनिक काळात भावे, किर्लोकर, देवल, खाडिलकर, गडकरी, यांनी मराठी नाटय वाङमयाला समर्थ केले. रंग मंचावर जे केले जाते त्यास 'खेळ', कागदावर लिहिलेले ती संहिता,इंग्रजीत लिहिलेले 'ड्रामा' स्टेवर केले जाते त्याला 'प्ले' व जो लिहितो तो 'प्लेराईट' असे म्हणतात. नाटकाच्या विषयी भावे म्हणतात की," नाटक हे संसाराचे चित्र आहे.त्यात मानवी वृत्ती - विकृती चे चित्रण केले जाते

नाटक हे सामाजिक, धार्मिक, ऐतिहासीक संदर्भ घेऊन आलेले असते. नाटकाच्या व्याख्या विविध विचारवंतानी केल्या आहेत. त्यामध्ये "सोंग घेऊन करण्याचा खेळ म्हणजे नाटक."(कर्वे ) अशी व्याख्या कवे यांनी केली. नाटकात सोंग घ्यावे लागते व त्याचा अविष्कार करावा लागतो असे ते म्हणतात. "भावानुकिर्तनम् लोकवृत्तानुकरण असते." (देशपांडे) असे मत भरतमूनींनी मांडले. "जीवन म्हणजे नाटय,जीवनाची जाणिव ही नाटयात्मक असते."(कुलकर्णी)असे मत वा.ल. कुलकर्णी व्यक्त करतात. "रंगभूमिवर नटाने केलेले संवाद व अभिनयाद्वारे लोक समुदायाला सांगितलेली गेलेली कथा म्हणजे नाटक होय."असे विचार ना.सी.फडके यांनी मांडले. तर "नाटक ही सौंदर्यानुभावाचे दृष्य आदान प्रदान करणारी कला आहे." (टिळक ) अशा प्रकारे वेगवेगळया विचारवंतांनी नाटक वाङमयाच्या व्याख्या सांगितल्या आहेत.

नाटकाची बिजे ही लोक वाङमयात सापडतात. प्राचिन काळी लोक रंजनाची अनेक साधणे होती. त्यामध्ये कळसुत्री भावल्याचा खेळ, दशावतार, दंडार, गंगासागर, तमाशा, रामायण इत्यादीतून नाटय रंगविले जाऊ लागले. "नाटक हा समूह मनाचा अविष्कार आहे." (कालभूत ) असे कालभूत म्हणतात. लोकनाटयाच्या बाबतीत आद्य रंगाचार्य असे म्हणतात की, लोकांनी लोकांसाठी जी रंगभूमी निर्माण कली आहे ते लोकनाटय् होय." अशा प्रकारे विविध विचारवंतानी लोकनाटयाच्या माध्यमातून नाटकाचे वर्णन केल आहेत. नाटय वाङमयाचे वेगवगळे प्रकार पडतात. सामाजिक, ऐतिहासीक, पौरानिक,धार्मिक असे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यामध्ये संजय सोनवनी यांचे "विक्रमादित्य " हे नाटक पुष्प प्रकाशन, पुणे यांनी २००६ मध्ये प्रकाशित केले.त्यांचे "गडया तू माणूस अजब आहेस", "राम नाम सत्य हे! ", "मीच मांडीन खेळ माझा" अशी त्यांनी नाटके लिहिली आहे. १९९० नंतरच्या काळखंडातील एक नामवंत

प्रेमात त्याग हा सर्वश्रेष्ठ ठरतो. नैतिक दृष्टीकोनातून समाज व्यक्तीकडे बघतो. पण व्यक्ती स्वातंत्र्याने त्याचे संदर्भ बदलतात. यानाट्यकृतीमध्ये काल्पनिक भावनेला अती महत्व दिले आहे.

**संदभ ग्रंथ सूची :**

१. जोशी प्र.न. : मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन काळ, पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आवृती-२००५, पृ. क्र. २३८.
२. भावे श्रीराम वासुदेव : 'संनाटय प्रतिभ', श्रीराम भावे प्रकाशन, पुणे,प्र.आ. २००६, पु. क्र. ७.
३. कर्वे वा.ची. : महाराष्ट्र शब्दकोश, पृ. क्र. १८१९.
४. डॉ. देशपांडे सरोज:भरतमूनीचे नाट्यशात्र्य,पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र. आवृती-२००७,पृ.क्र. १३८.
५. कुलकर्णी वा.ल.: साहित्य, स्वरूप आणि समीक्षा, मुंबई, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९९५, पृ.क्र.१३८.
६. टिळक विद्या गौरी : संपा. वाङमय इतिहास लेखन स्वरुप आणि समस्या, पुणे, प्रतिभा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९७,पृ.क्र. ११.
७. डॉ. कालभूत पु.मा. : लोकनाट्य : उदगम आणि विकास, विजय प्रकाशन, नागपुर, प्र.आ. १९९६,पृ.क्र.२.
८. रंगाचार्य आद्य: भारतीय रंगभूमी, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, अनु. कानिटकर,रा.प्र.प. पृ.क्र.८६.
९. सोनवणी संजय : विक्रमादित्य, पुष्प प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००५,पृ.क्र.९.
१०. तत्रैय : पृ.क्र. १०.